नियमीत दिवाणी दावा २०८/२०२३
संजय वि भिमराव
**निशाणी क्र ९५**

**प्रतिवादीकरीता साक्षीदार क्र. ३** यांचा जबाब,

देवाची शपथ खरे सांगतो,

**नांव - अभिजीत जोतीराम मोहीते.**

वय - २७ वर्षे.

धंदा - नोकरी, रचना सहाय्यक, नगर परिषद, कुर्डुवाडी.

राहणार - मु. पो. कुर्डुवाडी. तालुका माढा. जिल्हा सोलापूर.

**<u>प्रतिवादीतर्फे सरतपास वकील, श्री आर एम देशमुख</u>**

१. मला या प्रकरणात साक्ष देण्याकामी साक्षी समन्स प्राप्त झाले आहे. साक्षी समन्समध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे सोबत मी कागदपत्रे आणले असून, निशाणी ९४ सोबत ती दाखल करीत आहे. वादीस नगर परिषद, कुर्डुवाडी यांच्याकडुन जो बांधकाम परवाना देण्यात आलेला होता त्याची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे, त्यास **<u>निशाणी ९५/१</u>** देण्यात येते. तसेच वादीने बांधकाम परवानगी मागण्यासंदर्भात जो नकाशा स्थापत्य अभियंता आकाश तरंगे यांचा सादर केलेला होता, त्याची देखील प्रमाणित नक्कल हजर केली आहे, त्यास **<u>निशाणी ९५/२</u>** देण्यात येते. वादीने स्थापत्य अभियंता आकाश तरंगे यांच्यामार्फत बांधकाम परवाना मिळण्यासाठी नगर परिषद, कुर्डुवाडी यांच्याकडे जो अर्ज सादर केला होता, त्याची प्रमाणित नक्कल देखील सादर केली आहे, त्यास **<u>निशाणी ९५/३</u>** देण्यात येते. वादीचे बांधकामा संदर्भात ज्या तक्रारी नगर परिषद, कुर्डुवाडी यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या, त्या अनुषंगाने वादीने वादमिळकतीची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, माढा यांच्यामार्फत मोजणी करुन घ्यावी असे पत्र मुख्य अधिकारी, न.प., कुर्डवाडी यांच्याकडुन वादीस देण्यात आले होते, त्याची देखील प्रमाणित नक्कल आजरोजी मी सादर करीत आहे, त्यास **<u>निशाणी ९५/४</u>** देण्यात येते.

सरतपास संपला.

**<u>वादीतर्फे उलटतपास वकील, श्री वाय बी साठे यांचेमार्फत</u>**

२. आजरोजी वादीने न.प., कुर्डुवाडी यांच्याकडे बांधकाम परवानगी मिळण्यासाठी जे अर्ज व कागदपत्रे सादर केले होते, त्यासह वादीच्या बांधकामाबाबत न.प., कुर्डुवाडी यांच्याकडे ज्या तक्रारी

प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील कागदपत्रे मी सोबत आणली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादीने बांधकाम परवानगी मिळण्यासाठी सादर केलेल्या अर्जासोबत मोजणी नकाशा देखील सादर केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, बांधकाम परवानगी संदर्भात आवश्यक लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतरच न.प., कुर्डुवाडी म्हणजे आमच्या कार्यालयाकडुन बांधकाम परवानगी देण्यात येते. कागदपत्र अपुरे असतील तर परवानगी नाकारण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, वादीने सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यामुळेच त्यास बांधकाम परवाना देण्यात आलेला होता. मला सांगता येणार नाही की, वादीने बांधकाम परवाना अर्जासोबत जो नकाशा सादर केला होता, त्याप्रमाणेच बांधकाम केलेले आहे, साक्षीदार स्वतःहून पुढे खुलासा करतो की, त्या जागेची योग्य मोजणी झाल्याशिवाय त्याबाबत मला ठामपणे सांगता येणार नाही.

**३.** बांधकाम परवानासाठीचा अर्ज हा बांधकाम सुरु करण्यापूर्वी सादर करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, धारकाने परवानगी न घेता न.प., कुर्डुवाडी हद्दीत बांधकाम केल्यास ते बेकायदेशीर असे मानले जाते. प्रतिवादीच्या बांधकामा संदर्भात न.प., कुर्डुवाडी कार्यालयात काही तक्रारी प्राप्त होत्या किंवा काय याबाबत मला सांगता येत नाही. मी १२ जानेवारी २०२४ पासून रुजु झालेलो आहे. अनाधिकृत बांधकाम होत असल्यास ते तात्काळ थांबविण्याचे अधिकार न.प., कुर्डुवाडीचे अधिकाऱ्यांना आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस देवून देखील अनाधिकृत बांधकाम पुढे सुरु ठेवले असेल, तर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, कलम ५३ प्रमाणे त्या धारकाच्या विरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचे अधिकार न.प. अधिकाऱ्यांना आहे.

**४.** निशाणी ६६ वर आता मला दाखविलेली नोटीस ही आमच्या कार्यालयाकडुन प्रतिवादी सुनिल यास देण्यात आलेली आहे. ती नोटीस प्रतिवादी सुनिल याने त्याचे बांधकामा संदर्भात कागदपत्रे सादर करावे व बांधकाम थांबवावे अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, कलम ५३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल असे सूचित करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी सुनिलचे होत असलेले बांधकाम हे अनाधिकृत होत होते, त्यामुळेच सदरची नोटीस निशाणी ६६ त्यास देण्यास आली होती. प्रतिवादीची मिळकत सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ या संदर्भात न.प., कुर्डुवाडी यांच्याकडे प्राप्त असलेल्या तक्रारी अगर इतर कागदपत्रे आज साक्षीकामी आणलेले नाहीत. प्रतिवादीने बांधकामाची रितसर परवानगी घेतलेली नसल्यामुळे ती देण्यात आली होती किंवा काय तसा त्यात उल्लेख नसल्यामुळे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी

रुजु होण्यापूर्वी प्रतिवादीची मिळकत क्र १३५६ याबाबत न.प., कुर्डुवाडी यांच्याकडे झालेल्या तक्रारीबाबत मला माहिती नाही.

**५.** निशाणी ९५/४ वरील पत्राप्रमाणे आजतागायत मोजणी झालेली नाही. सदरची मोजणी का झाली नाही याचे कारण मला सांगता येईल, मोजणी अर्ज भरतेवेळी वादीने / अर्जदाराने इतर सहधारकांची संमती घेतलेली नव्हती, तसेच मोजणी कामास सहधारक प्रतिवादी क्र २ अनिल मुरलीधर कांबळे याने हरकत उपस्थित केली होती, त्यामुळे मोजणी झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने उपस्थित केलेल्या आक्षेपामुळे वादीच्या बांधकामास प्राप्त झालेला घरकुल निधी देखील तसाच पडून राहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने रितसर परवानगी घेवून, त्याप्रमाणे बांधकाम केलेले आहे. साक्षीदार दिलेल्या उत्तरास पुढे खुलासा करतो की, तसे मोजणी झाल्याशिवाय म्हणता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच वादीने ज्यादा क्षेत्रावर बांधकाम केलेले आहे याबाबत मी ठामपणे सांगू शकणार नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.10.15 15:53:37 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - १५/१०/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.